PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 9, ISSUE 2

# अनुभव, आत्मआविष्कार, भावना व ललित निबंध

**प्रा. डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक
(मराठी विभाग)
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर **(महाराष्ट्र) भारत**

**प्रस्तावना :**

माणसाला सुचणारा कोणताही विचार त्याला येणाऱ्या वास्तवातील विविध अनुभवांवरून सुचतो. सुचलेलया विचाराला तो आपल्या व इतरांच्या जीवनातील वा ग्रंथातील अनेक उदाहरणे शोधतो. आपले नंतर येणारे अनुभव त्या विचांराशी तो जीवनात काही आडाखे, नियम बांधून जीवन सुकर, सुंदर करतो. अशा रीतीने मनात आलेल्या विचारांना आपले विविध अनुभव, उदाहरणे, दृष्टांत, पुरावे यांची जोड देऊन मांडण्याची प्रवृत्ती तशी वाङ्मयात जुनी आहे. ती एकूण वैचारिक व ललित वाङ्मयात स्पष्ट-संदिग्ध, स्थुल-सूक्ष्म, प्रत्यक्षाप्रत्यक्ष, प्रतीकरूप, वास्तव इत्यादी स्वरूपात तसेच अनुभव, माहिती, वर्णन, शोध यांच्या स्वरूपात सर्वत्र दिसतो. साहित्याच्या (म्हणजे ललित वाङ्मयाच्या) सर्वच प्रकारात ती तशी दाखविता येणे शक्य आहे.

ललित निबंध ही एक त्या प्रवृत्तीची तर्कसंगतीच्या दिशोने व विचारांना महत्त्व देणाऱ्याच्या हेतून विकसित झालेली अवस्था आहे. तर ललित निबंध ही विचारांपेक्षा ते विचार ज्या अनुभवाद्वारा सुचले त्या अनुभवांनाच महत्त्व देऊन त्या दिशेने विकसित झालेली अवस्था आहे.

**भावना व अविष्कार हे ललित निबंधाचे केंद्रबिंदू ठरतात :**

ललित निबंधाच्या काही लेखनात विषय वस्तुच्या निमित्ताने 'मी' ने जो अनुभव घेतलेला असतो त्या वस्तुच्या अनुषंगाने कलात्मक घटकांची संघटना प्रस्थापित करणे सोपे जाते. कारण ती एरवी विषय-वस्तु वाटत असली तरी ती 'मीत्वा' च्या आविष्काराच्या किंवा आत्मशोधाच्या प्रस्तुततेमुळे बाजुला पडल्यासारखी वाटत नसते. भावना व अनुभव घाटाची बंदीश एकत्रित झाल्याचा भास होतो. एरवी इतर साहित्यप्रकारात आपण विषय-वस्तूच्या अनुषंगानेच घाटाची बंदीश प्रस्थापित झाली की नाही ते पाहत असतो. पण ललित निबंधात त्या समजुतीला खूप महत्त्व देतात. उदाहरणार्थ, 'आठवणी-अनुभव' 'लघुनिबंध', 'प्रवासलेख' या उपप्रकारांच्या बाबतीत पुष्कळ वेळा 'मीत्वा' चा आविष्कार ठळक दिसत असतो. तरी व तो काहीसा प्रस्तुत विषय मानता येतो. तरी, 'व्यक्तिचित्र' व 'ललित लेख' या उपप्रकाराच्या बाबतीत मात्र विषयवस्तूच 'मीत्वा' च्या आविष्काराच्या तुलनेने प्रभावी ठरलेली असते. प्रस्तुत विषय म्हणून आलेली असते. तिथे त्या विषय वस्तुच्या अनुषंगाने कलात्मक घटकांचे सौंदर्यसंघटन शोधावे लागते. एवढेच नव्हे तर काही ललित निबंधात किंवा काही प्रवास लेखांतही ते सापडू शकते. त्यामुळे 'ललित निबंध' या साहित्यप्रकारात आविष्कार हे केंद्र मानायचे हे महत्त्वाचे ठरते.

यावरून एक गोष्ट आपल्या लक्षात येते की, 'ललित निबंध' या साहित्यप्रकारात मुळातच म्हणजे त्याच्या सर्जनप्रक्रियेत द्विकेंद्रीय अवस्था असते : भावना आणि आविष्कार जिच्या आधारे व्यक्त होऊ पाहते ती' विषय-वस्तु' त्यामुळे या प्रकाराचे लेखन कधी मीत्वाच्या आविष्कारासाठी होते तर कधी विषयवस्तुच्या अंगाने होते; तर

पुष्कळ वेळा या दोहोचाही तो साधण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळे त्याचा अनुभव आविष्कार ललित साहित्यात विलक्षण अवस्थेतच जाणवू लागतो.

**ललित साहित्यात 'वास्तव अनुभव प्रतिबिंबित होतो :**

वास्तविक तात्विक दृष्टीने कोणत्याही 'अनुभव' या वस्तूकडे आपण पाहिले तर तिच्यात द्विकेंद्रीय अवस्था नेहमीच असते, असे आढळून येईल. मग तो अनुभव सर्जकाचा असो वा समीक्षकाचा असतो. ज्ञानाच्या बाबतीत ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान अशी त्रयी असते, तशी अनुभवाच्या बाबतीतही अनुभव घेणारा (भोक्ता), विषयवस्तू (भोग्य) आणि अनुभव (भोग) अशी त्रयी असते. याचा अर्थ असा की, ज्या विषयवस्तुतून संवेदनाप्रेरके निर्माण होतात ती विषयवस्तू त्या अनुभवाचे एक केंद्र असते. या दोन केंद्राशिवाय अनुभव निर्माणच होऊ शकत नाही. अनुभवाची ही द्विकेंद्रीय अवस्थाच ललित निबंधात खऱ्या अर्थाने अवतरत असते. ती इतर कोणत्याही साहित्यप्रकारापेक्षा अधिक वास्तव स्वरूपात 'ललित निबंधात' व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य लेखकाला मिळते. त्या दृष्टीनेच गद्य साहित्यप्रकारात 'ललित निबंध' वास्तवाकडे घेऊन जाणारा साहित्यप्रकार मानावा लागतो.

कथा, कादंबरी, नाटक या प्रकारांत अशा अनुभवांच्या मूळ स्वरूपावर वाङ्मयीन संस्कार करून दोन दृष्टीनी त्या अनुभवाची शुद्धता भ्रष्ट करावी लागते : एक तर तो अनुभव कल्पनीय पातळीवर मांडावा लागतो. दुसरे त्याची पुर्नमांडणी किंवा नवनिर्मिती करावी लागते. अर्थात अशा प्रकारची कल्पनीयाच्या पातळीवरची नवनिर्मिती सर्जक साहित्यीकाला आनंदही देत, ही गोष्ट खरी. पण त्याचे असे काही अनुभव असतात की जे जसे आले तसेच मांडावेत, त्याच्या वास्तव रूपाला धक्का लावू नये, असे त्याला वाटत असते. अशा अनुभवाचा गोडवा नैसर्गिक झाडासारखा असतो तर कथा, कादंबरी, नाटक या प्रकारातील अनुभवांचा गोडवा (आपणाला हवी तशी छाटणी आणि मांडणी

करून) बागेत वाढवलेल्या झाडासारखा असतो. दोन्हीही झाडे जिवंतच असतात आणि दोन्हीही सुंदरच असतात. पण दोन्हीच्या सुंदरतेच्या शक्यता वेगवेगळ्या असतात एवढेच दोन्हीचेही काही फायदे-तोटे असतात.

कथा, कादंबरी, नाटक या साहित्यप्रकारात व्यक्त होणाऱ्या अनुभवाची मांडणी करताना लेखक आपल्याला आलेल्या अनुभवाची पात्र-प्रसंगाच्या व निवेदनाच्या आधारे 'सिच्युएशन' निर्माण करून ती सिच्युएशन मांडत असतो आणि त्या सिच्युएशनच्या आधारे रसिकाला (आपल्याला जसा अनुभव आला) तसाच अनुभव यावा याची व्यवस्था करतो. पण ललित निबंधात लेखक 'अनुभव' च मांडत असतो. 'सिच्युएशन' तेथे गौणस्थानी गेलेली असते. ललित निबंधात 'सिच्युएशन' चे स्थान गौण असल्याने व तिच्या आधारे आलेला 'अनुभव' प्रधान स्थानी ठेवावयाच्या असल्याने ललित निबंधाची मांडणी कथा-कादंबरी-नाटख यांच्या मांडणीपेक्षा प्रकृतीनेच भिन्न होते. (किंवा असते.) कथा कादंबरी-नाटकात 'सिच्युएशन' प्रधान स्थानी असल्याने तिथे रसिकाला 'सिच्युएशन' च्या आधारेच अनुभव घ्यावा लागतो. तर ललित निबंधात 'सिच्युएशन' गौण स्थानी गेल्याने व त्या सिच्युएशनचा लेखकाने घेतलेला 'अनुभव' प्रधान स्थानी असल्याने रसिकाला तेथे लेखकाने विशिष्ट सिच्युएशनचा 'अनुभव' कसा घेतला आहे. एवढीच सह-अनुभवीची भूमिका स्वीकारावी लागते.

**आत्माविष्कार हा ललित निबंधाचा स्थायी भाव होतो :**

यावरून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येईल की कथा, कादंबरी, नाटक यात लेखक विषय-वस्तूचे एकच केंद्र उभे करण्याचा प्रयत्न करीत असतो. या साहित्यप्रकारांच्या निर्मितिप्रक्रियेत त्याला 'मीत्वा' च्या अनुभवाचा प्रत्यक्षाचा किंवा आभासाच्या पातळीवर लोप करायचा असतो व तो अनुभव देणारी फक्त सिच्युएशनची

मांडणी करायची असते. नाटकासारख्या प्रकारात या सिच्युएशनचे निखळ रूप लक्षात येते. तेथे 'मीत्वा' चा लोप प्रत्यक्षाच्या किंवा आभासाच्या पातळीवर झालेला आपणास स्पष्ट जाणवत असतो. ललित निबंधात काहीशी याच्या उलट अवस्था असते. उदाहरणार्थ, 'आम्रयोग', या लघुनिबंधामध्ये गो. वि. करंदीकर 'आंबा' या विषयवस्तूची मांडणी करून तो 'मी' कसा अनुभवतो किंवा अनुभवला हे सांगतात. आंब्याविषयी सर्व माहिती देत नाहीत; तर 'मी' तो कसा अनुभवतो एवढे 'आंब्या' विषयी सर्व माहिती देत नाहीत; तर 'मी' तो कसा अभुवतो एवढे सांगण्यापुरती आवश्यक तेवढीच विषयवस्तूची माहिती देतात. मात्र ती अजिबातच सांगण्यापुरती आवश्यक तेवढीच विषयवस्तूची माहिती देतात. मात्र ती अजिबातच देत नाहीत, असेही नाही. 'मी' चा अनुभव आविष्कृत करण्यासाठी जेवढी 'सिच्युएशन' आवश्यक आहे. तेवढा आधार आवश्यक आहे. तेवढी तिथे येते. म्हणजे ललित निबंधाचा कल 'मीत्वा' चा अनुभव व्यक्त करण्याकडे असतो. सिच्युएशन मांडण्याकडे नव्हे, यामुळेच ललित निबंधाला काही गुणविशेष लाभलेले आहेत.

हा 'मीत्वा' चा अनुभव ललित निबंधात व्यक्त करतांना क्वचित प्रसंगी आणखी एका मांडणीची शक्यता असते., ती नाकाराता येत नाही. ही मांडणी कथेच्या अंगाने सरकते. या मांडणीत 'मी' ला जो स्वत:चा अनुभव व्यक्त करायचा असतो तो ललित निबंधात अनुभव म्हणून प्रत्यक्ष पद्धतीने व्यक्त न करता तो सिच्युएशन-पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रयत्न करू शकतो. उदाहरणार्थ, पाणभवरे (आनंद यादव) या संग्रहातील 'बहिणीचे लगीन' अशा वेळी ललित निबंधाच्या मांडणीत 'मीत्वा' चे केंद्र शबल होऊन विषयवस्तूचे केंद्र प्रबल होणे शक्य असते. पण 'मीत्वा'ला जेव्हा विषय वस्तूतील अशा खूप गुंतागुंती पकडायचा असतात की ज्यांच्या आधारे त्याला आपला तसाच गुंतागुंतीचा अनुभव मांडायचा असतो, तो मांडण्यासाठी त्याला जे विषय वस्तूत

घटना प्रसंगांच्या ओघात बारीक-सारीक घडत गेले, त्या ओघातच आत्मआविष्कार लेखक ललित निबंध साधतो.

**अनुभवाचे स्वरूपामुळे ललित निबंध आकारास येतात :**

अशा मांडणीत पुष्कळवेळा अनुभव घेणारे 'मीत्व' हेच शबल असल्यामुळे अशी विषयवस्तू केंद्राच्या अंगाने मांडणी झाली असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. (प्रत्यक्ष वाचनाच्या वेळीच त्याचा प्रत्यय काय सांगेल यावर ते अवलंबून असते.) मात्र याचा परिणाम असा होतो की, अशा प्रकारचा 'ललित निबंध' हा कथेसारखा वाटू लागतो, किवा त्यात कथेचे गुणधर्म उतरल्यासारखे वाटू लागते.

मग त्याला 'कथा' म्हणता येईल का? तसे म्हणता येईल असे वाटथ नाही. कारण त्या लेखनातील 'मी'त्व हे कथेतल्याप्रमाणे कल्पनीय नसते, तर वास्तवातील लेखक 'मी' शी नाते सांगणारे, संवादी व्यक्तिमत्व असते. ते जर कल्पनीय मानले तर ते विशिष्ट लेखन निश्चितपणे कथा मानता येईल. पण ललित निबंधातील 'मी' हा या कल्पनीय पातळीवर वावरण्याचे नाकारता येईल पण ललित निबंधातील 'मी' वाचत असतांना आपल्या नेहमी लक्षात येते. अशा विशिष्ट प्रकारच्या लेखनाच्या तर तिच्यातील 'मी' कल्पनीय ठरतो आणि 'ललित निबंध' या नावाखाली छापले तर त्यातील 'मी' कल्पनीय न ठरता वास्तवातील लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी संवादी असलेला 'मी' मानावा लागतो. श्रीनिवास विनायक कुलकर्णी; यांच्या डोह, सोन्याचा पिंवपळ या संग्रहातील 'मी' हा श्रीनिवास कुलकर्णी नव्हे, असे मानता येत नाही. तसे मानले तर सगळी प्रवास वर्णने, आठवणी –अनुभव-लेखने काल्पनिक ठरतील. आपण अशा प्रकारची लेखने काल्पनिक आहेत, असे मानून वाचत नसतो; वाचूही शकणार नाही, उलट, एखादी 'कथा' लेखकाच्या जीवनात घडलेली असली तरी ती लेखकाच्या

जीवनात घडलेली घटना' म्हणून आपण अनुभवत नसतो. साहित्याचा रसिक या नात्याने तशी ती स्वीकाराताही येत नाही.

ललित निबंधात 'मी' एखादी विषयवस्तू कशी अनुभवतो, हेच प्रस्तुत असल्याने ललित निबंधाच्या अभिव्यक्त आंगिक रुपाला काही वैशिष्ट्ये प्राप्त झालेली असतात. त्याला कथात्कता पुष्कळ वेळा का प्राप्त होते हे आपण वर पाहिले आणि त्या दोहोतील फरकही पाहिला.

अनेकदा ललित निबंधात अनुभव व भावना हे दोन गुण विशेषत्वाने रसिकाच्या मनात भरत असतात. वास्तविक हे दोन्ही गुण साहित्याच्या कोणत्याही प्रकारात आपणास दिसू शकतात. ते फक्त ललित निबंधातच दिसतात असे नव्हे. मात्र ते विशेषत्वाने ललित निबंधातच दिसतात. 'ललित निबंध' या साहित्यप्रकाराच्या अंगाने आणि त्यात व्यक्त होणाऱ्या अनुभवाच्या स्वरूपाच्या अंगाने ललित निबंध आकारात येतात.

**अनुभववर्णन, कलात्मक पद्धतीने मांडून ललित निबंधात काव्यात्मकता व चिंतनात्मता आणता येते :**

एखादी व्यक्ती जेव्हा साहित्यिक असते तेव्हा साहित्यिकाचे एख वाङ्मयीन जीवन तिच्या आयुष्यातसुरू झालेले असते. ते जीवन ती साहित्यिक व्यक्ती वाङ्मयविश्वात अनुभवत असते. मराठी साहित्यिक आपले वाङ्मयीन जीवन प्रामुख्याने मराठी वाङ्मयविश्वात अनुभवत असतो. (मराठी) वाङ्मयविश्वाचा एक इतिहास असतो. त्या वाङ्मयविश्वात काही परंपरा चालत आलेल्या असतात. लघुनिबंधाच्या दारातून पुढे 'ललित निबंधा'चे स्वरूपविशेषही त्या परंपरेने चालत येणे शक्य आहे. मराठी साहित्यिकाला जेव्हा एखादा ललित निबंध सुचतो, तेव्हा नेमके

काय झालेले असते? त्या 'सुचण्या'मध्ये ललित निबंधाचे परंपरागत स्वभावविशेष असलेला 'मीत्वाचा अनुभव' त्या साहित्यकाला आलेला असणे शक्य असते. आणि त्याला वाटू शकते की मला 'ललित निबंध सुचला'. इथे त्या साहित्यिकाच्या नकळत 'ललित निबंध' या परंपरागत चालत आलेल्या साहित्यप्रकाराचेच व त्याच्या स्वभावविशेषांचेच नियंत्रण मीत्वाच्या अनुभवावर आलेले असते. किंवा एखादा दिवाळी अंकाचा संपादक लेखकाच्या पत्रात 'उत्तम ललित निबंध' पाठवून द्या, अशी भाषा योजतो, तेव्हा लेखकाच्या पत्रात 'उत्तम ललित निबंध' पाठवून द्या, अशी भाषा योजतो, तेव्हा लेखकाच्या मनात काय येतेय मराठीतील उत्तम ललित निबंधाची कल्पना तो करतो आणि तशा प्रकारचे लेखन करण्याचा प्रयत्न करतो, तशी शक्यता असते. अधिक स्पष्ट करण्यासाठी असे म्हणता येईल की परंपरागत ललित निबंधाचे गुणविशेष ज्या प्रकारच्या अनुभवात साहित्यिकाला दिसतात तेच अनुभव तो 'ललित निबंध' लिहून व्यक्त करण्याची शक्यता पुष्कळशी असते. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी ललित निबंधात जर काव्यात्मता व चिंतनशीलता पूर्वीपासूनच अवतरत असेल तर ती परंपरेने अवतरतच राहणार. कारण एखादा अनुभव जसा एखाद्या साहित्यप्रकाराचे मागणे करतो, तसा एखादा साहित्यप्रकारही त्यात व्यक्त होणाऱ्या अनुभवाकडून काही मागणे मागत असतो. दुसरे असे की अशा अनेक घनिष्ठ आंगिक गुणांकडे पुष्कळ वेळा प्राकारिक गुणविशेष म्हणून पाहण्याची रूढीही पडलेली असते. साहित्यिक ती सर्वसाधारणपणे मोडण्याचा प्रयत्न करीत नाही. त्यामुळे ललित निबंधात काव्यात्मता व चिंतनात्मता अधिक जोपासली जात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**समारोप :**

ललित निबंधात आत्मनिष्ठ लेखन असते. आणि मानसशास्त्रीय दृष्ट्या साहित्यात व्यक्त होणारे अनुभव हे 'मी' च्या जीवनातीलच असतात. कधी ते उघड उघड आत्मनिष्ठ लेखनपद्धतीने प्रत्यक्षरूपात, तर कधी वस्तूनिष्ठेचे रूप धारण करून छुप्या पद्धतीने अगर दुसऱ्या व्यक्तीच्या (पात्रांच्या) नावावर अप्रत्यक्ष रूपात, तर कधी आदर्शवादाच्या, उदात्तीकरण्याच्या प्रेरणेने स्वेतर मानवी मनाच्या आविष्काराच्या रूपात अवतरत असतात. म्हणजे अंतिमत: साहित्य हा आत्मनिष्ठेचाच आविष्कार आहे असे मानले तर 'ललित निबंध' हा साहित्यप्रकार इतर सर्वच साहित्यप्रकारांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष रूपात व्यापून उरतो. असे मानावे लागते. तत्वज्ञानाच्या व्यापक पातळीवर जाऊन 'ललित निबंध' अनुभव आत्मआविष्कार व भावना यांच्या सुरेख संमिश्रणातून आकारास येते हे जाणवते.

## संदर्भसूची :

१) मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास : प्र. न. जोशी

२) मराठी वाङमयाचा इतिहास खंड ४ व ५ : संपा. रा. श्री. जोग.

३) प्रदक्षिणा – खंड पहिला व दुसरा : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

४) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग दुसरा – अ. ना. देशपांडे

५) मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप : संपा. गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर